जा.क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-सेल/7203/2023
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.
दिनांकः- 04.09.2023

## जाहिरात

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड येथील राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM)योजने अंतर्गत खालील पदे कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर भरण्यासाठी अर्हताधारक उमेदवाराकडुन खालील वेळापत्रकानुसार अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदाची खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता धारणकरणा-या उमेदवारांनी शैक्षणिक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह नियोजित दिनांकास परिपूर्ण अर्ज सादर करावा.

| वेळापत्रक | |
|---|---|
| कंत्राटी करार तत्वारील पदांचे नाव | अर्ज स्विकारणे दिनांक व वेळ व स्थळ |
| स्त्रीरोग तज्ञ(विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी UCHC)-०१,<br>मायक्रोबायोलॉजीस्ट-०१,<br>अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी-०४,<br>साथरोग तज्ञ-०१<br>(वरील पदांना मुलाखत घेण्यात येईल.) | अर्ज स्विकारणे दिनांक २५.०९.२०२३ (सोमवार)<br>वेळ- सकाळी १०.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत<br>स्थळ / ठिकाण :- शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडियम परिसर, नांदेड<br>मुलाखत दिनांक :-२५.०९.२०२३ (सोमवार)वेळ दु. ३.०० ते ४.०० |
| परिचारीका-०९, प्रयोगशाळा तंत्रज्ञ-०६, मिश्रक-०४, एक्सरे टेक्निशियन-०१, ओटी असिस्टंट-०१<br>(वरील पदांना मुलाखत घेण्यात येणार नाही.) | अर्ज स्विकारणे दिनांक २६.०९.२०२३ (मंगळवार)<br>वेळ- सकाळी १०.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत<br>स्थळ / ठिकाण :- शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडियम परिसर, नांदेड |

| अ. क्रं. | पदाचे नांव (कंत्राटी पध्दतीने) | पद संख्या | आवश्यक शैक्षणिक पात्रता व अनुभव | उच्चत्तम वयो मर्यादा | प्रवर्गा नुसार आरक्षण | एकत्रित वेतन (प्रतिमहा) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्त्रीरोग तज्ञ (विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी UCHC) | ०१ | स्त्रीरोग तज्ञ (०१ पद) M.D./M.S. Gyn./DNB/ in Gynecology M.C.I ./ महाराष्ट्र मेडिकल कॉन्सीलकडील नोंदणी अनिवार्य. | ७० वर्ष | लागु नाही | रु.७५,०००/- |
| २ | मायक्रोबायोलॉजीस्ट | ०१ | MD Microbiology M.C.I ./ महाराष्ट्र मेडिकल कॉन्सील कडील नोंदणी अनिवार्य. | ७० वर्ष | लागु नाही | रु.७५,०००/ |
| ३ | अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी (Part-Time Medical Officer) | ०४ पैकी ०२ पद स्त्री रोग तज्ञ व ०२ पदे बाल रोगतज्ञ | स्त्रीरोग तज्ञ (०२ पद अर्धवळ) M.D./DNB/DGO in Gynecology M.C.I ./ महाराष्ट्र मेडिकल कॉन्सीलकडील नोंदणी अनिवार्य.<br>बाल रोगतज्ञ तज्ञ (०२ पद अर्धवळ) MD Paed/ DCH/DNB M.C.I ./ महाराष्ट्र मेडिकल कॉन्सील कडील नोंदणी अनिवार्य. | ७० वर्ष | लागु नाही | रु.३०,०००/- |
| ४ | साथरोग तज्ञ | ०१ | Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health | ७० वर्ष | लागु नाही | रु.३५,०००/ |
| ५ | परिचारीका | ०९ | १० वी व ए.एन.एम. कोर्स उत्तीर्ण, एम.एन.सी.कॉन्सीलकडील नोंदणी अनिवार्य | ६५ वर्ष | अ.ज.-०२,<br>इमाव-०१,<br>खुला-०६ | रु.१८,०००/- |
| ६ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ०६ | १२ वी, DMLT | ६५ वर्ष | अ.ज.-०१,<br>वि.जा-अ-०१,<br>आ.दु.घ.-०१<br>खुला-०३ | रु.१७,०००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | मिश्रक | ०४ | १२ वी + Diploma(D Pharm.) फार्मसी कॉन्सीलकडील नोंदणी आवश्यक. | ६५ वर्ष | अ.ज.-०१, इमाव-०१, आ.दु.घ.-०१ खुला-०१ | रु.१७,०००/ |
| ८ | एक्सरे . टेक्निशियन | ०१ | १२ वी + Diploma in relevant field (Diploma in Radiology) | ६५ वर्ष | लागु नाही | रु.१७,०००/ |
| ९ | ओटी असिस्टंट | ०१ | १२ वी + Diploma in relevant field (Operation room Assistant Course From a recognized institution) | ६५ वर्ष | लागु नाही | रु.१७,०००/ |

अटी व शर्ती :-

1. अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था यांचा अथवा राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत असणारा अनुभव ग्राहय धरण्यात येईल.
2. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.१५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.१००/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. Integrated Health & Family Welfare Society NWCMC Nanded. या नावे जोडणे आवश्यक आहे.
3. स्त्रीरोग तज्ञ(विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी UCHC), मायक्रोबायोलॉजीस्ट, अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी, साथरोग तज्ञ या पदांसाठीच मुलाखत आयोजित करण्यात येईल(जाहीरातील अनु.क्र.०१ ते ०४ वरील पदांसाठीच). तसेच उर्वरीत इतर पदांसाठी(अनु.क्र.०५ ते ०९) मुलाखत न घेता उमेदवारांची नियुक्ती ही गुणांकन पध्दतीनुसार निवड करण्यात येईल या गुणांकन पध्दतीनुसार उमेदारांना पदासाठी आवश्यक Qualifying Exam मधील गुण(अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीच्या ५०% Proportion घेण्यात यईल. तसेच पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता)मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीच्या २०% प्रमाणे Proportion घेण्यात येईल.
4. तसेच संबंधित पदाची निगडीत अनुभव प्रत्येक एक वर्षासाठी ०६ गुण देण्यात येतील. (जास्तीत जास्त ३० गुणापर्यंत) व त्यानुसार उमेदवाराची गुणवत्ता यादी करुन निवड करण्यात येईल. याची उमेदवाराने नोंद घ्यावी.
5. वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असुन त्याचा कालावधी हा दिनांक २९ जुन २०२४ पर्यंत असेल. व सदर पदे NUHM PIP च्या अधिन राहुन तसेच संबंधिताचे कामाचे मुल्यांकन अहवालानुसार व आवश्यकतेनुसार मुदतवाढ देय राहील. PIP मध्ये सदरील पदे कमी झाल्यास आपली नियुक्ती आपोआपच संपुष्टात येईल.
6. वय वर्ष ६० नंतर जिल्हा शल्य चिकीत्सक यांचेकडुन शारीरीक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र मुलाखतीच्या दिवशी सादर करणे अनिवार्य राहील. तसेच निवड झाल्यानंतर सदर प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच पुनर्रनियुक्ती आदेश देण्यात येतील.
7. उपरोक्त संबंधित पदाकरीता तत्सम काऊंसीलचे रजिस्टेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.
8. वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत सदर पदावर शासकीय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागु नाहीत.
9. केंद्र / राज्य शासनाने संबंधित पद नामंजुर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्व सुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.
10. सर्व पदांसाठी उमेदवाराने विहीत नमुण्यातील अर्जासोबत पासपोर्ट साईज फोटो (दोन), शैक्षणिक अर्हतेची १० वी (गुणपत्रक / प्रमाणपत्र), १२ वी (गुणपत्रक / प्रमाणपत्र), पदवीचे सर्व गुणपत्रक (पहीले वर्ष ते अंतीम वर्ष), पदवी प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, वय व अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, वयाचा पुरावा म्हणुन (१० वी व १२ वी प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला) ही सर्व कागदपत्र

अर्जासोबत झेरॉक्स प्रतीत ( साक्षांकीत / स्वंय साक्षांकीत) जोडावीत. नावात बदल असल्यास राजपत्र, विवाह नोंदणी आणि नोटराईज् अफेडेव्हीट जोडणे आवश्यक राहील.

11. उमेदवार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल नसावा.
12. उमेदवारांची अर्ज करीत असलेल्या पदांचे नांव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जात स्पष्टपणे नमुद करावा.
13. अर्ज सादर करणेकामी व जाहीरातीत नमुद मुलाखतीकरीताच्या पदाकरीता कोणताही प्रवास भत्ता व इतर कोणताही भत्ता देय राहणार नाही.
14. भरती प्रक्रीया स्थगीत करणे / रद्द करणे / पद भरतीत बदल करण्याचे सर्व अधिकार तसेच रिक्त पदाच्या संख्येत / सामाजिक आरक्षण / पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन निवड प्रक्रीयेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त तथा अध्यक्ष निवड समिती, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी राखुन ठेवले आहेत.
15. अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.
16. जाहीरातीसह अर्जाचा नमुना हा www.nwcmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला असुन, त्याप्रमाणेच विहीत नमुण्यात अर्ज सादर करावा. अन्यथा उमेदवाराचा अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही.
17. मुलाखती नंतर निवड झालेल्या उमेदवारांना करार पत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजु होताना सादर करावा लागेल.
18. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन ०७ दिवसामध्ये नियुक्तीच्या ठिकाणी रुजु होणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपुष्टात आणुन प्रतिक्षा यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.
19. सदरील पदे NUHM / संबंधित योजने अंतर्गत राहतील. त्याचा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही. वरील सर्व पदे कंत्राटी पध्दतीने एकत्रित वेतनावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे भविष्यात कायम सेवेचा लाभ देता येणार नाही.
20. उमेदवारांची पात्र / अपात्र तसेच अंतिम निवड यादी / प्रतिक्षा यादी महानगरपालिकेच्या नोटिस बोर्ड व वेबसाईट www.nwcmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
21. उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा खाजगी व राजकीय दबाव आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस रद्द करण्यात येईल.
22. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर उमेदवारांने चुकीची माहिती/प्रमाणपत्र/कागदपत्रे सादर केल्याचे/ दिशाभूल केल्याचे अथवा कोणत्याही प्रकारची माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी/निवड /नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात/संपूष्टात आणण्यात येईल.
23. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर अपात्र / अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकरचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.
24. महाराष्ट्र शासन नागरी सेवा (लहान कुंटुबाबातचे प्रतिज्ञापत्र) नियम-२००५ अन्वये विहीत उमेदवारांने त्यांचे दि.२८.०३.२००५ अन्वये रोजी हयात असलेले व त्यानंतर जन्माला आलेली अपत्यांची संख्या याबाबत विहीत नमुन्यात प्रतीज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड.

प्रत,

1) सिस्टम मॅनेजर, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी सदर जाहीरात सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुण्यासह संकतस्थळावर प्रसिध्द करावी.
2) जनसंपर्क विभाग, मनपा नांदेड यांनी सदर जाहीरात नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावी.

प्रति,

मा. आयुक्त,

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**विषय :- .............................. या पदासाठी अर्ज सादर करण्या बाबत.**

**संदर्भ :-** दैनिक..........................वृत्तपत्रात प्रकाशित झालेली जाहिरात.

उपरोक्त जाहिरातीच्या अनुषंगाने मी,..........................................या पदासाठी अर्ज करीत आहे. व त्यांची आवश्यक माहिती खालील प्रमाणे आहे.

1. उमेदवाराचे नाव : (मराठी मध्ये- अडनाव प्रथम) ..............................................................
2. उमेदवाराचे नांव (SURNAME FIRST- IN ENGLISH CAPITAL LETTER) ...........................
   ...................................................................................................................
3. जात ................................ प्रवर्ग ............................
4. पत्र व्यवहाराचा सध्याचा संपुर्ण पत्ता रा. ................................ ता. ................. जिल्हा. ................ पिन कोड क्र. ................ मोबाईल क्र. ............................ ई-मेल..................
5. कायमचा संपुर्ण पत्ता रा. ....................... ता. ................. जिल्हा. ................. पिनकोड क्र......... मोबाईल क्र. ............................
6. जन्म तारीख (अंकात) दिनांक .......... महिना ............... वर्ष ..........
7. जाहिरातीच्या दिनांकास वय वर्ष .............. महिना ........... दिवस .........
8. राष्ट्रीयत्व .........................................................
9. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी प्रमाणपत्र जोडले आहे काय ? होय / नाही.
10. जात वैधता प्रमाणपत्र आहे काय ? होय / नाही. / लागु नाही.
11. जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या संवर्गासाठी लागू असलेल्या चौकटीमध्ये ( ) अशी खुण करावी.

| अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | आ.दु.घ | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

12. अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील.

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | बोर्ड/मंडळ/ विद्यापीठ | प्राप्त गुण | टक्केवारी | उत्तीर्ण वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| 1. | एस.एस.सी. | | | | |
| 2. | एच.एस.सी. | | | | |
| 3. | पदवी | | | | |
| 4. | पदवीका | | | | |

13. तांत्रीक व इतर अर्हतेचा तपशील.

| अ.क्र. | तांत्रीक व इतर अर्हता | बोर्ड/मंडळ/ विद्यापीठ | अंतीम वर्षात प्राप्त गुण | टक्केवारी | उत्तीर्ण वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| 1. | | | | | |
| 2. | | | | | |
| 3. | | | | | |
| 4. | | | | | |

14. शासकिय/निमशासकिय कार्यालय/स्था.स्व.सं./NHM कडील अनुभव:- होय / नाही

(असल्यास किती वर्षाचा व कोणत्या कार्यालयाचा आहे. ते खालील प्रमाणे नमुद करावे.)

.................... वर्ष कार्यालयाचे नाव ..................................................

मी असे प्रमाणित करतो / करते की, मला जाहिराती मधील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच अर्जात नमुद केलेली माहिती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशिर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

दिनांक :-

**उमेदवारांची स्वाक्षरी**

ठिकाण :-

संपूर्ण नांव----------------------------------

राहणार.-------------------------------------

ता. ............................जिल्हा. .............

मो.क्र..................................................

**महाराष्ट्र नागरीसेवा (लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापत्र)**

**नियम 2005 मधील प्रतिज्ञापत्राचा**

**नमुना – अ**

मी श्री / श्रीमती ....................................................... ......................................................

श्री...................................... यांचा/यांची/मुलगा/ मुलगी/ पत्नी वय.........वर्ष, राहणार ...........................

याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

1) मी ...................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

2) आज रोजी मला............इतकी ह्यात मुले आहेत. त्यापैकी 28 मार्च 2005 यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या,..................................आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.)

3) ह्यात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च 2005 व तंद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

दिनांक :-

ठिकाण :-

**उमेदवाराची स्वाक्षरी**

नांव................................................

राहणार...........................................

ता............................जिल्हा..............

मो.क्र..............................................